**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० **E.Mail- pilcbnskr@gmail.com**

---

**प्रेसनोट** दिनांक :- **१३/०७/२०१८**

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परिक्षेत यश संपादन करणारे विद्यार्थ्यांचा पोलीस अधीक्षकांच्या हस्ते सत्कार

---

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परिक्षेत यश संपादन करणारे नाशिक जिल्हयातील विद्यार्थी **डॉ.विशाखा अशोक भदाणे व कु.अभिजित कैलास खैरणार** यांचा आज रोजी **मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांचे हस्ते पोलीस अधीक्षक कार्यालयात सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभ प्रसंगी अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो तसेच सत्कारमुर्ती विद्यार्थ्यांचे पालक व नातेवाईक उपस्थित होते.

पालकांचे सर्वात मोठे समाधान मुलांच्या यशात असते, सटाणा तालुक्यातील आराई येथील सर्वसाधारण कुटूंबातील विद्यार्थीनी डॉ. विशाखा अशोक भदाणे हिने क्रेंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत देशात ७८३ वी रॅंक मिळवुन यश संपादन केले आहे. मराठा विद्या प्रसारक समाजाचे गांधीनगर येथील जनता विद्यालयात नुकतेच सेवानिवृत्त झालेले श्री. अशोक भदाणे, ह.मु. मखमलाबाद, नाशिक यांची मुलगी डॉ. विशाखा हि पंचवटीतील गणेशवाडी येथील आयुर्वेदीक महाविद्यालयातुन सन २०१३ मध्ये बीएएमएसची पदवी घेवुन डॉक्टर झाली आहे. सन २०१५ पासुन तिने युपीएससीच्या अभ्यासाला सुरूवात करून दोन अपयशानंतर अहोरात्र मेहनत घेवुन जिद्दीने यश संपादन केले आहे. आपल्या यशाचे श्रेय तिने आई-वडीलांना दिले असुन प्रशासकिय सेवेत दाखल झालो तर समाजामध्ये काहीतरी बदल घडवुन आणु अशी भावना विशाखाने व्यक्त केली.

तसेच नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलात कार्यरत असलेले **पोहवा श्री. कैलास खैरणार** यांचा मुलगा कु.अभिजित खैरणार याने क्रेंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत देशात ३२ वा तर राज्यात तिसरा येण्याचा मान मिळविला. त्याची केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात उपअधीक्षक पदी निवड झाली आहे. अभिजित याने संदिप फाउंडेशन अभियांत्रिकी शाखेतुन पदवी मिळविली आहे. पदवीचे शिक्षण घेतांनाच स्पर्धा परिक्षेची तयारी सुरू केली होती. अभिजित याने आपल्या यशाचे श्रेय आई-वडीलांना दिले असुन पोलीस दलातुनच प्रेरणा मिळाली असल्याचे सांगितले आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परिक्षेत यश संपादन केलेले वरील दोन्ही विद्यार्थ्यांचा नाशिक ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांनी सत्कार केला, तसेच त्यांना भावी वाटचालीसाठी मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थीही स्पर्धा परिक्षांमध्ये यश संपादित करत आहे. स्पर्धा परिक्षांमध्ये यशस्वी होणेसाठी जिद्द आणि मेहनतीने अभ्यास केला तर यश नक्कीच मिळवु शकाल असे पोलीस अधीक्षकांनी सांगितले.